ठाणे, गुरुवार दि. ८ ऑगस्ट २०२४ वर्ष : १३, अंक : १०१ , पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

# दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे

संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख

**आप आणि केंद्र सरकारमध्ये संघर्ष**

सर्वोच्च न्यायालयाने नुकताच निर्णय दिला आहे की, दिल्ली महानगरपालिकेत नगरसेवक नेमण्याचा कायदेशीर अधिकार राज्यपालांना आहे. यासाठी राज्यपाल ......पान २ वर



विनेश फोगाट ऑलिम्पिकमधून अपात्र घोषित, भारताचे पदक हुकले

...पान ३ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**

कमाल ३६° से | किमान २९° से

**बाजार**

सोने ७३,२८० | चांदी ९३,६८०

**डोकं खाजवा** –अशोक सुतार

**थोडक्यात घडामोडी**





## राज्यसभेच्या दोन जागांसाठी ३ सप्टेंबरला पोटनिवडणूक

मुंबई – नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपचे उमेदवार उदयनराजे भोसले हे सातारामधून तर केंद्रीय मंत्री पियूष गोयल हे उत्तर मुंबई मतदारसंघातून निवडून गेल्याने राज्यसभेच्या दोन जागा रिक्त झाल्या... आहेत. या रिक्त जागांसाठी येत्या ३ सप्टेंबरला पोटनिवडणूक घेण्यात येणार आहे. भारत निवडणूक आयोगाने बुधवारी महाराष्ट्रातील राज्यसभेच्या दोन जागांसह एकूण १२ जागांच्या पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला. आयोगाने घोषित केलेल्या कार्यक्रमानुसार १४ ऑगस्ट २०२४ रोजी पोटनिवडणुकीची अधिसूचना जारी केली जाईल. इच्छुक उमेदवारांना २१ ऑगस्टपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येतील. २२ ऑगस्टला उमेदवारी अर्जांची छाननी केली जाईल तर २६ ऑगस्ट ही उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख आहे. त्यानंतर आवश्यकता भासल्यास ३ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत मतदान घेण्यात येईल. (पान २ वर)

## विना परवानगी झाड तोडल्यास ५० हजारांचा दंड होणार...

# राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत १३ मोठे निर्णय

**मुंबई :–मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत विविध विभागातील महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.मंत्रालयातील मंत्रिमंडळ सभागृहात झालेल्या या बैठकीस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचेसह मंत्रिमंडळातील सदस्य उपस्थित होते. या बैठकीत १३ विविध निर्णय घेण्यात आले असून जलसंपदा विभाग, शेतकरी, आदिवासी आणि वनविभागासाठी महत्त्वाचे निर्णय जाहीर करण्यात आले आहेत.**

आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णयानुसार परवानगी न घेता झाड तोडल्यास ५० हजार रुपयांचा दंड आकारला जाणार आहे. यापूर्वी (पान २ वर)

**मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णय (संक्षिप्त)**

- शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर सिंचन महत्वाकांक्षी वैनगंगा नळगंगा नदीजोड प्रकल्पास मान्यता;पावणे चार लाख हेक्टर क्षेत्राचे सिंचन होणार
- आता प्रकल्पबाधितांना सदनिका मिळणार. धोरणास मान्यता
- लहान शहरांतील पायाभूत सुविधांना वेग येणार; कर्ज उभारण्यास मान्यता
- आदिवासी विभागातील प्राथमिक शिक्षकांना शिक्षण पात्रता परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी दोन वर्षे मुदतवाढ.
- अनुसूचित जाती जमातीच्या जात, वैधता प्रमाणपत्र मिळण्यातल्या अडचणी दूर होणार. अधिनियमात सुधारणा करण्याचा निर्णय
- विना परवानगी झाड तोडल्यास आता ५० हजार रुपये दंड
- महाराष्ट्र लॉजिस्टिक धोरण राबविणार. पाच वर्षात तीस हजार कोटींचे उत्पन्न मिळणार
- कागल येथे आयुर्वेद महाविद्यालय ; आजरा तालुक्यात योग व निसर्गोपचार महाविद्यालय
- न्यायमूर्ती, मुख्य न्यायमूर्तींना सेवा निवृत्तीनंतर घर कामगार, वाहनचालक सेवा
- सेना कल्याण शैक्षणिक संस्था आणि राधा कल्याणदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्टला मुद्रांक शुल्कात १०० टक्के सूट
- जुन्नरच्या श्री कुकडेश्वर आदिवासी हिरडा औद्योगिक सहकारी संस्थेस अर्थसहाय्य
- ९ ऑगस्टपासून राज्यात हर घर तिरंगा अभियान मोठ्या प्रमाणावर राबविणार.अडीच कोटी घरांवर तिरंगा फडकविणार.विविध कार्यक्रमांचे आयोजन
- अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या स्थापनेस मंजुरी

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संघर्षावर आधारीत

# 'योद्धा कर्मयोगी- एकनाथ संभाजी शिंदे' पुस्तकाचे प्रकाशन सोहळा उत्साहात संपन्न





**मुंबई : राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संघर्षावर आधारीत 'योद्धा कर्मयोगी– एकनाथ संभाजी शिंदे' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आलं. त्यावेळी दोन्ही उपमुख्यमंत्री उपस्थित होते. या पुस्तकावर बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघे यांचे फोटो हवे होते असं मत अजित पवारांनी व्यक्त केलं. तर देवेंद्र फडणवीसांनी यातील एक चूक सांगितली. मुख्यमंत्रिपदाची घोषणा ही सागर बंगल्यावर झाली असं पुस्तकात म्हटलंय, पण ती राजभवनवर केली असं दुरूस्त करून घ्या अशा सूचना फडणवीसांनी दिल्या.**

**एकनाथ शिंदेवरील 'योद्धा कर्मयोगी' पुस्तकात दोन कमतरता, दादा–फडणवीसांची लेखकाला सूचना** (सविस्तर वृत्त पान २)

**मुंबई : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी १ कोटींपेक्षा जास्त अर्ज शासन दरबारी प्राप्त झाले असून या अर्जांचा ओघ अद्यापही कायम आहे. कारण, राज्य सरकारने १५ ऑगस्टची मुदत वाढवून आता ३१ ऑगस्टपर्यंत लाडक्या बहिणींना अर्ज करण्यासाठी मुभा दिली आहे. त्यामुळे, लाडकी बहीण योजनेसाठी महिलांकडून मोठ्या प्रमाणात अर्ज केले जात आहेत. त्यातच, आता, लाडक्या बहिणींसाठी आणखी एक गुडन्यूज आली आहे. त्यानुसार, १७ ऑगस्ट रोजीच या योजनेचा पहिला हफ्ता ३००० रुपये महिलांच्या बँक खात्यात जमा होणार आहे. त्यामुळे, रक्षाबंधनापूर्वीच बहिणींना ओवाळणी मिळणार असल्याचे स्पष्ट झालं आहे.**

# राज्य सरकारचं ठरलं...

## लाडकी बहीण योजनेचे दोन्ही हप्ते १७ ऑगस्टला जमा होणार



मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा पहिला हप्ता १७ ऑगस्टलाच मिळणार असून याबाबत शासन दरबारी निर्णय झाला आहे. विशेष म्हणजे १७ ऑगस्ट रोजी राज्य सरकारकडून भव्य दिव्य कार्यक्रमाच्या माध्यमातून हे पैसे वितरीत केले जाणार आहेत. आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत यावर निर्णय घेण्यात आल्याची माहिती आहे. या कार्यक्रमाला एकाच मंचावरती मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री उपस्थित असणार (पान २ वर)

# लाडकी बहीणच्या भरघोस यशानंतर आता राज्य सरकारची लाडकी मोलकरीण योजना

राज्य सरकारनं अर्थसंकल्पात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची घोषणा केली. या योजनेच्या घोषणेनंतर राज्यभरातून महिलांनी योजनेसाठी अर्ज करण्यासाठी गर्दी केली.

मध्य प्रदेशच्या लाडली बहना योजनेच्या धर्तीवर राज्य सरकारकडून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना लागू करण्यात आली आहे. यानंतर आता असंघटित क्षेत्रातील मोलकरणींसाठी देखील सरकार लवकरच एक गृहोपयोगी साहित्य वाटपासंदर्भातील योजनेवर काम करत आहे. एका वृत्तपत्राला यासंदर्भात माहिती दिली. तसेच,

**घरकाम करणाऱ्या महिलांना १० हजारांचा लाभ?**

राज्यात तब्बल १० ते १२ लाख घरगुती कामगार–मोलकरणींची संख्या असल्याची माहिती सरकारच्याच वतीनं जाहीर करण्यात आली आहे.

एका वृत्तपत्राला माहिती देताना एका अधिकाऱ्यानं सांगितलं की, बांधकाम क्षेत्रातील कामगारांसाठीची भोजन योजना आणि कामावरील साहित्य संचवाटपाच्या धर्तीवरच नोंदणीकृत घरेलू कामगार, (पान २ वर)

# मुंब्र्यात इमारतीच्या ५ व्या मजल्यावरुन पडलेला कुत्रा चिमुकलीच्या अंगावर आदळला

**मुलगी जागीच गतप्राण, कुत्रा सहीसलामत**

ठाणे: ठाण्यातील मुंब्रामध्ये धक्कादायक घटना घडल्याचे समोर आले आहे. ३ वर्षांच्या चिमुकलीवर पाचव्या मजल्यावरुन कुत्रा पडल्याने तिचा मृत्यू झाला आहे. सदर घटनेचं सीसीटीव्ही फुटेजही समोर आलं आहे. मुंब्रामधील अमृत नगरमध्ये चिराग मेसन इमारतीच्या ५ व्या मजल्यावरुन एक कुत्रा थेट खाली पडला. यावेळी ३ वर्षांची मुलगी आपल्या आईसोबत रस्त्याने चालत होती आणि कुत्रा नेमका या मुलीच्या अंगावर पडला. या घटनेनंतर मुलीला रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र तिचा यावेळी मृत्यू झाल्याची माहिती समोर आली. या घटनेतील कुत्रा देखील गंभीर जखमी झाला असून त्याला प्राणी रुग्णालयात नेण्यात आले आहे.



**नेमकं काय घडलं?** सदर घटना मंगळवारी दुपारी २ वाजता घडल्याचं समोर आलं आहे. मुंब्रामधील अमृत नगरमध्ये चिराग मेंशन इमारतीच्या टेरेसवर जैद सय्यद नावाचा व्यक्तीने कुत्रा पाळला होता. ६ ऑगस्ट, मंगळवारी दुपारी हा कुत्रा अचानक पाचव्या मजल्यावरुन खाली कोसळला. यादरम्यान रस्त्यावरुन आईसोबत जाणाऱ्या ३ वर्षांच्या जाणाऱ्या मुलीच्या अंगावर हा कुत्रा पडल्याने तिचा या घटनेत मृत्यू झाला. कुत्रा अंगावर पडताच सदर मुलगी जागेवरचं बेशुद्ध पडते. यामुळे आई ताबडतोब डॉक्टरांकडे जाते. परंतु मुलीचा दुदैवी मृत्यू होतो. कुत्रा देखील खाली पडल्यानंतर काहीकाळ बेशुद्ध होता. परंतु थोड्यावेळाने कुत्रा जागेवरुन उठल्याचे व्हिडीओद्वारे समोर आले आहे.

## कोट्यवधी रुपयांची उलाढाल असलेल्या कंपनीचा मुंबईतून काढता पाय,बंगरुळूत होणार शिफ्ट

मुंबई:–गेल्या काही वर्षात अनेक प्रकल्प महाराष्ट्रातून इतर राज्यात गेले आहेत. आता कोट्यवधी रुपयांची उलाढाल असलेली एक कंपनी मुंबईतून निघणार आहे. या कंपनीचे मुख्यालय बंगरुळूत शिफ्ट होणार आहे. मुंबईत आकारलं जाणारं अव्वाच्या सव्वा भाडं यासाठी कारणीभूत ठरले आहे. (पान २ वर)





अंबरनाथमध्ये भाजपतर्फे १८ ऑगस्ट रोजी

# 'रक्षाबंधन' निमित्त लाडकी बहीण योजना पात्र महिलांना साडी भेट

अंबरनाथ – महाराष्ट्र सरकारने जाहीर केलेल्या 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने'अंतर्गत गरीब कुटुंबातील महिलांना दरमहा १५०० रुपये मिळणार असून ते थेट तिच्या खात्यात जमा करण्यात येणार आहे. राज्यभरातून लाखो महिला अर्ज नोंदणी करण्यासाठी कार्यालयाबाहेर रांगा लावून अर्ज भरताना दिसून येत आहेत. त्या अनुषंगाने अंबरनाथ पूर्व,बी केबिन रोड येथील भारतीय जनता पार्टी जनसंपर्क कार्यालयात शेकडो महिलांची या योजनेचा लाभ घेण्यासाठी झुंबड गर्दी पाहता... या योजनेस पात्र महिलांना भेट



कुपन दिले जात आहे. या सर्व पात्र महिलांना 'रक्षाबंधन' निमित्त १८ ऑगस्ट रोजी साडी भेट दिली जाणार असल्याचे भाजप प्रदेश सरचिटणीस तथा अंबरनाथ विधानसभा निवडणूक प्रमुख गुलाबराव करंजुले पाटील यांनी महिलांना कुपन वाटप करताना सांगितले.

येत्या रक्षाबंधनला जुलै आणि ऑगस्ट या दोन्ही महिन्यांचे ३ हजार रुपये लाभार्थी (पान २ वर)



येत्या काही दिवसात गणरायाचे आगमन होणार आहे. सर्व ठिकाणी लगबग सुरु आहे. ठाण्यातील खोपट परिसरात दिप आर्ट येथे राम मुर्तीची प्रतिकृती साकारलेली गणरायाची मूर्ती तयार करण्यात येत आहे. मुर्तीकार दिपक कदम मूर्ती सजवताना टिपलेले छायाचित्र.. (छाया – मनोज सिंह)

# अलिबाग विरार बहुउद्देशीय मार्गिका प्रकल्पाच्या भूसंपादनाला शेतकऱ्यांकडून विरोध

**अलिबाग – रायगड जिल्ह्यात अलिबाग विरार बहुउद्देशीय मार्गिका प्रकल्पाच्या भूसंपादनाला शेतकऱ्यांकडून विरोध होत आहे. या विरोधामुळे, प्रकल्प रखडण्याची चिन्हे आहेत. पहिल्या टप्प्यासाठी रायगड ५७६ हेक्टर आवश्यक असताना जेमतेम २५ टक्के भूसंपादनही पूर्ण झालेले नाही.**

प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात पनवेल, उरण आणि पेण तालुक्यातील ५७६ हेक्टर जमिनी या प्रकल्पासाठी संपादित केल्या जाणार आहेत. यात पनवेल मधील ३९, पेणमधील ०८ तर उरणमधील १६ गावांतील जमिनींचा समावेश आहे. महाराष्ट्र महामार्ग अधिनियम १९५५



कायद्यानुसार या प्रकल्पासाठी भूसंपादनाची प्रक्रिया सुरू आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यासाठी भूसंपादन करत आहे.

पनवेल तालुक्यातील ३३९ हेक्टर जमीन या प्रकल्पासाठी संपादित केली जाणार आहे. खाजगी वाटाघाटीतून ७१.७८ हेक्टर जमिनीचे भूसंपादन करण्यात आले आहे. तर २७६ हेक्टर भूसंपादन शिल्लक आहे. तर उरण तालुक्यातील १२९ हेक्टर जमीन या प्रकल्पासाठी संपादित केली जाणार असून यापैकी २७.२१ हेक्टर जागाच संपादित होऊ शकली आहे.

पेण तालुक्यातील १०८ हेक्टर जमीन या प्रकल्पासाठी संपादनाचे काम सध्या सुरू आहे. ऑगस्ट २००२ पासून भूसंपादनाची प्रक्रिया सुरू झाली आहे. दोन वर्षांत खाजगी वाटाघाटीतून फक्त ११.४२ हेक्टर भूसंपादन होऊ शकले आहे. तर ९६ हेक्टर क्षेत्राचे भूसंपादन शिल्लक आहे.

भूसंपादनासाठी संपादन संस्थेकडून २ हजार १६४ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. मात्र शेतकऱ्यांनी अद्याप ही रक्कम स्वीकारलेली नाही. भूसंपादनासाठी वाढीव दर मिळावा यासाठी शेतकरी आग्रही आहेत. त्यामुळे आता जिल्हा प्रशासनाकडून शासनाकडे वाढीव दरांबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. यावर निर्णय होत नाही तोवर भूसंपादनाचा तिढा सुटण्याची चिन्हे दिसत नाही.

सध्या शेतकऱ्यांशी वाटाघाटी करून जागा संपादित केल्या जात आहेत. जमिनींचे बाजारमूल्य लक्षात घेऊन दर निश्चिती करण्यात आली आहे. पण शेतकऱ्यांना वाढीव दर हवा आहे. त्यामुळे सुधारीत दर निश्चितीसाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात केला आहे.

**– प्रविण पवार, प्रांताधिकारी पेण.**

शेतकऱ्यांचा प्रकल्पाला विरोध नाही. पण शासनाकडून दर निश्चिती करताना एकाच गावात शेतकऱ्यांना वेगवेगळे दर दिले जात आहेत. महत्वाची गोष्ट म्हणजे दरांमधील तफावत खूप मोठी आहे. त्यामुळे भूसंपादनास विरोध होतो आहे. शासनाने एका गावात एकच दर निश्चित करून भूसंपादन करायला हवे.

**– वैकुंठ पाटील, जिल्हा उपाध्यक्ष भाजप.**

# ‘योद्धा कर्मयोगी- एकनाथ संभाजी शिंदे’ या पुस्तकाचे प्रकाशन सोहळा उत्साहात संपन्न

मुंबई : राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संघर्षावर आधारीत ‘योद्धा कर्मयोगी- एकनाथ संभाजी शिंदे’ या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आलं. त्यावेळी दोन्ही उपमुख्यमंत्री उपस्थित होते. या पुस्तकावर बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघे यांचे फोटो हवे होते असं मत अजित पवारांनी व्यक्त केलं. तर देवेंद्र फडणवीसांनी यातील एक चूक सांगितली. मुख्यमंत्रिपदाची घोषणा ही सागर बंगल्यावर झाली असं पुस्तकात म्हटलंय, पण ती राजभवनवर केली असं दुरूस्त करून घ्या अशा सूचना फडणवीसांनी दिल्या.

मुख्यमंत्र्यांच्या पुस्तकावर बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघे याचा फोटो असायला हवा होता हे माझं मत आहे, ते टाकायला हवं अशा सूचना अजित पवारांनी केल्या. ते म्हणाले की, कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना ठाण्याच्या किसन नगरमधील शाखाप्रमुख हा मुख्यमंत्री होतो हा त्याच्या मेहनतीचा भाग आहे. एक कट्टर शिवसैनिक आणि धाडसी नेता या पुस्तकातून दिसला.

तर देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आताच दादांनी बोलताना काही गोष्टी सूचवल्या, बदल करण्याच्या सूचना केल्या. यात पुस्तकात एका पॅरात लिहिले की मुख्यमंत्रिपदाची घोषणा सागर बंगलयावर केली. पण ती राजभवनात केली असं दुरूस्त करायला हवे.

## एकनाथ शिंदेवरील ’योद्धा कर्मयोगी’ पुस्तकात दोन कमतरता, दादा-फडणवीसांची लेखकाला सूचना

### शिंदे-फडणवीस पुढे गेले, मी तिथेच राहिलोय : अजित पवार

एकनाथ शिंदे यांच्यावर आधारीत पुस्तकाचे प्रकाशन कार्यक्रमावेळी बोलताना अजित पवार म्हणाले की, ठाण्याच्या या ऐतिहासिक नगरीत खूप काही घडलंय. सामान्य नागरीक ते मुख्यमंत्री असा प्रवास एकनाथराव शिंदे यांनी केलाय. देवेंद्र फडणवीस यांची टर्म १९९९ साली सुरु झाली. तर एकनाथ शिंदेंची कारकिर्द २००४ पासून सुरू झाली. मी यांच्या आधीचा आहे, पण हे दोघे पुढे गेले आणि मी तिथेच राहिलो. मी देवेंद्र फडणवीस यांना म्हटलं की मला जर मुख्यमंत्री करणार असं बोलला असता तर संपूर्ण पार्टीच घेवून आलो असतो.

**माझा फॅन फॉलोविंग कमी** – अजित पवार म्हणाले की, साताऱ्यातील दरे या गावी एकनाथ शिंदे सातत्याने जात असतात. ते शेती करत असतानाचे अनेक व्हिडिओ मी पाहतो. मलाही शेतीची आवडं आहे. मीही सकाळी फेरफटका मारायला जातो. मात्र आमचे काही फोटो, व्हिडीओ असे येत नाहीत, कारण आमचा तेवढा फॅन फॉलोविंग नाही. अजित पवार म्हणाले की, उदय सामंत यांना मी तिकीट दिलं, त्यांना मंत्री केलं, दिपक केसरकर यांनाही मीच तिकिट दिलं. शिंदेंसोबत असणारी अर्धी अधिक मंडळी माझी आहेत. पण शिंदेंनी ही मंडळी हेरली, त्यांना सोबत घेतलं आणि आता मलाही घेऊन गेले.

**लोकांच्या गराड्यात राहणारा मुख्यमंत्री** – मी अनेक मुख्यमंत्री पाहिले मात्र लोकांच्या गराड्यात अडकलेला हा पहिला मुख्यमंत्री पाहिला अशी स्तुतीसुमनं अजित पवारांनी उधळली. ते म्हणाले की, कॅबिनेट बैठकीतही मुख्यमंत्र्यांच्या बाजूला गराडा असतो. लोकांच्या अर्जावर सर्वाधिक सह्या करणारा हा मुख्यमंत्री आहे.

### एकनाथ शिंदे हेच खरे नायक

शिंदे सत्तापक्षात असताना त्यांनी सत्ता सोडायची आणि सर्वांना सोबत घ्यायचं, त्यानंतर पुन्हा सत्तास्थापन करायची ही गोष्ट सोपी नव्हती, त्यामुळे शिंदे हेच खरे नायक आहेत. आम्ही अनेक पदं भूषवली मात्र आमचे संबध चांगले राहिले. बाळासाहेबांच्या हिंदुत्वाचे विचार संपवण्याचा प्रयत्न सुरू झाला तेव्हा आम्ही एकत्र आलो. आमच्यातील मॅग्नेटने दादांनाही खेचून घेतलं आणि सरकार बनवलं. आनंद दिघेंनी शिंदेंच्या आयुष्याला वळण दिलं, वाईट प्रसंगातून दिघेंनी बाहेर काढून उर्जा दिली. त्यानंतर समाजसेवासाठी उतरलेल्या शिंदेंनी मागे फिरून पाहिले नाही. पडेल ते काम केलं, रिक्षाही चालवली. मात्र जाज्वल्य हिंदुत्वाचा परिणामही त्यांच्यावर दिसतो. लोकांमध्ये राहणारा व्यक्ती अशी त्यांची ओळख आहे. त्यांच्याकडे सर्वाधिक पेशन्स आहे. मात्र पेशन्स संपले की ते कोणाचंही एकत नाहीत.

# संपादकीय...



संपादक-चंद्रकांत भोईटे

## आप आणि केंद्र सरकारमध्ये संघर्ष

सर्वोच्च न्यायालयाने नुकताच निर्णय दिला आहे की, दिल्ली महानगरपालिकेत नगरसेवक नेमण्याचा कायदेशीर अधिकार राज्यपालांना आहे. यासाठी राज्यपाल सक्षम असून त्यांना राज्य मंत्रिमंडळाच्या मंत्र्यांशी सल्लामसलत करण्याची काहीही गरज नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाने आप सरकारच्या कारभाराला धक्का बसला आहे. मुसळधार पावसामुळे राजधानीतील पायाभूत सुविधा कोलमडल्याचे दिसत आहे. राजधानी दिल्लीचा कारभार नक्की कोणाच्या हातात आहे, हा प्रश्न आता उपस्थित होत आहे. जुलै महिन्यात, दिल्ली आंतरराष्ट्रीय विमानतळावर पावसामुळे पाणी साचले आणि मोठे नुकसान झाले. राजिंदर नगरमध्ये कोचिंग सेंटरच्या बेसमेंटमध्ये पाणी साचल्यामुळे तीन विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू झाला, आणखी एकाचा वीज पडून मृत्यू झाला, तसेच दोघांचा नाल्यात पडून मृत्यू झाला आहे. या घटनेसाठी दिल्ली सरकार, तुरुंगात असलेले मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, उपराज्यपाल व्ही. के. सक्सेना आणि आपच्या नेतृत्वाखालील दिल्ली महानगरपालिकेवर (एमसीडी) आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. गेल्या आठवड्यात, शहरी विकास मंत्री सौरभ भारद्वाज यांनी दिल्लीचे मुख्य सचिव नरेश कुमार आणि इतर उच्च अधिकाऱ्यांसह घेतलेल्या बैठकीची व्हिडिओ क्लिप जारी केली. त्यांनी या क्लिपमध्ये दिल्लीतील नाल्यांचे गाळ काढण्यात आले नसल्याचा पुरावा दाखवत निराशा व्यक्त केली आहे. केंद्र सरकार अधिकार्यांना त्यांच्या नियंत्रणात ठेवत असल्याचे आरोप आप सरकारने केले आहेत. गेल्या वर्षी, केंद्राने सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाचा निकाल रद्दबातल करणारा अध्यादेश काढला होता, जो काही दिवसांपूर्वीच पारित झाला होता. या अध्यादेशात असे नमूद करण्यात आले आहे की, जर सरकार राज्याच्या सेवेत तैनात असलेल्या अधिकाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्यास आणि त्यांना जबाबदार धरण्यास सक्षम नसेल तर त्याची जबाबदारी थेट विधीमंडळाकडे असेल. या दुरुस्तीला दिल्ली सरकारने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले असून अद्याप प्रलंबित आहे. तसेच आम आदमी पक्ष आपल्या प्रमुख नेत्यांविरुद्ध खटलेही लढवत आहे. मुख्यमंत्री केजरीवाल आणि माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्या व्यतिरिक्त, आप पक्षाचे अनेक नेते केंद्रीय यंत्रणेच्या रडारवर आहेत. सरकारमध्ये मंत्र्यांचीही कमतरता आहे. माजी समाजकल्याण मंत्री राज कुमार आनंद यांनी प्रथम बसपा आणि नंतर भाजपामध्ये सामील होण्यासाठी आप पक्ष सोडल्यामुळे सरकारला सात सदस्यीय मंत्रिमंडळात एका मंत्र्याची कमतरता आहे. सिसोदिया आणि माजी मंत्री सत्येंद्र जैन यांना अटक करण्यात आल्यानंतर बहुतांश विभाग एकाच मंत्र्याकडे म्हणजे आतिशी यांच्याकडे आहेत. विभागांच्या असमान वाटपावरून पक्षांतर्गत उलटसुलट चर्चा सुरू झाली आहे. काही विरोधकांचे म्हणणे आहे की, आप सरकारने केंद्राबरोबर काम करण्याचा मार्ग निवडण्याऐवजी संघर्षाचा पर्याय निवडला आहे. उदाहरणार्थ, शीला दीक्षित यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस सरकारने अटल बिहारी वाजपेयी सरकारच्या काळात केंद्र सरकारबरोबर समन्वय साधून काम केले. अनेक मुलाखतींमध्ये, शीला दीक्षित यांनी म्हटले होते की, त्यांनी मांडलेल्या बहुतेक प्रकल्पांना मंजुरी देण्यासाठी केंद्राकडून कशी मान्यता मिळवली. त्यांच्या कार्यकाळातही अनेक आव्हाने आलीत. उदाहरणार्थ, पूर्ण राज्याचा दर्जा देण्याच्या काँग्रेसच्या मागणीवरून दीक्षित यांचे केंद्राशी मतभेद होते. केंद्रात काँग्रेसचे सरकार असताना कॉमनवेल्थ गेम्सच्या काही महिने आधी त्यांच्या संमतीशिवाय दिल्लीतील अनेक अधिकाऱ्यांची बदली करण्यात आली. डिसेंबर २०१२ च्या दिल्ली सामूहिक बलात्काराच्या घटनेने संपूर्ण शहरात व्यापक निषेध झाला, दीक्षित यांच्यावर कायदा आणि सुव्यवस्था त्यांच्या नियंत्रणाखाली नसल्याचेही अनेक आरोप झाले होते. तणावाच्या घटना तेव्हाही घडल्या, परंतु त्यातून कसा मार्ग काढावा हे दीक्षित यांना चांगले माहीत होते. परंतु, आपच्या कार्यकाळात एकामागून एक घटना घडल्या आहेत. हे निदर्शनास आणून दिल्यावर, आप नेत्यांनी असा युक्तिवाद केला की, आपने नऊ वर्षांपासून ज्या परिस्थितीचा सामना केला, त्या परिस्थितीचा सामना काँग्रेसने केला नाही. आपचा वाढता आलेख, १२ वर्षांत दिल्लीत सलग तीनदा विजय, पंजाबमध्ये सरकार, इतर राज्यांमध्ये आमदार आणि अनेक राज्यांतील नगरसेवक ही भाजपाला चिंतेत टाकणारी गोष्ट आहे. त्यामुळे अनेक चुकांचे खापर आपवर फोडले जात असल्याची भावना आपच्या नेत्यांमध्ये आहे. केंद्र आणि दिल्ली राज्यातील या वादामुळे दिल्लीतील अनेक विभागांमध्ये, विशेषत: पीडब्ल्यूडी आणि दिल्ली जल मंडळात काम ठप्प आहे. अनेक रस्ते पुनर्विकासाचे प्रकल्प अनेक महिन्यांपासून बँड आहेत. दिल्ली जल मंडळाने लाजपत नगरमध्ये नवीन सीवर लाइन टाकणे किंवा संगम विहारमधील पाइपलाइन यासारखे प्रकल्प सुरू केलेले नाहीत. या सर्वांमुळे पावसाळ्यात दिल्लीची बिकट परिस्थिती झाली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर महानगरपालिकेत भाजपाला मोठे मत मिळण्याची अपेक्षा असल्याने आता तेथेही संघर्ष अपेक्षित आहे. दिल्ली महानगरपालिका सभागृहात आप बहुमतात आहे. १५ वर्षांहून अधिक काळात पहिल्यांदाच भाजपाचे त्यावर नियंत्रण नाही. परंतु आता, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर भाजपाच्या बाजूने अनेक गोष्टी पलटू शकतात. दिल्लीची जमीन, कायदा, सुव्यवस्था आणि पोलिसिंग केंद्राच्या अंतर्गत येतात. एमसीडी, दिल्ली जल बोर्ड, डीडीए आणि पाटबंधारे आणि पूर नियंत्रण विभागासह नाल्यांच्या साफसफाईसाठी किमान सहा वेगवेगळे विभाग जबाबदार आहेत. मात्र, राज्य सरकार आणि केंद्र सरकारच्या वादाचा परिणाम या विभागातील कामकाजावर झाल्याचे पाहायला मिळत आहे.

## राज्यसभेच्या दोन जागांसाठी ३ सप्टेंबरला पोटनिवडणूक

**(पान १ वरून)** त्यानंतर पाच वाजता मतमोजणी होऊन निकाल घोषित केला जाईल. महायुतीत राज्यसभेच्या दोन जागांपैकी भाजप आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस प्रत्येकी एक जागा लढविणार आहे. राज्यसभेच्या दोन जागा निवडून आणण्याइतके संख्याबळ महायुतीकडे आहे. त्यामुळे ही पोटनिवडणूक बिनविरोध होण्याची दाट शक्यता आहे. दरम्यान, राष्ट्रवादीकडून सातारा जिल्ह्यातील नेते नितीन पाटील यांना उमेदवारी दिली जाणार आहे. लोकसभा निवडणुकीत अजित पवार यांनी पाटील यांचे नाव जाहीर केले होते. तर भाजपकडून (इगझ) विनोद तावडे यांच्या नावाची चर्चा आहे. या पोटनिवडणुकीमुळे राज्यसभेतील अजित पवार गटाच्या सदस्यांची संख्या तीनवर पोहचणार आहे. दरम्यान, उदयनराजे भोसले यांची जागा राष्ट्रवादी काँग्रेसला दिली जाणार आहे. त्यामुळे पोटनिवडणुकीत निवडून जाणाऱ्या उमेदवाराला राज्यसभेत जवळपास पावणेदोन वर्षाचा कालावधी मिळेल. भोसले यांच्या जागेची मुदत २ एप्रिल २०२६ रोजी संपणार आहे. तर पियूष गोयल यांच्या रिक्त जागेची मुदत ४ जुलै २०२८ पर्यंत आहे.

## राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत १३ मोठे निर्णय

**(पान १ वरून)** दंडाची रक्कम १ हजार रुपये होती. याबाबचा जीआर वनविभागाकडून लवकरच जारी करण्यात येणार आहे. त्यामुळे यापुढे झाडांची कत्तल करताना किंवा झाडे तोडताना हजारवेळा विचार करावा लागणार आहे. त्याचबरोबर या बैठकीत लहान शहरांतील पायाभूत सुविधांना वेग देण्याविषयी चर्चा झाली.

## लाडकी बहीण योजनेचे दोन्ही हप्ते १७ ऑगस्टला जमा होणार

**(पान १ वरून)** आहेत. तर, प्रत्येक जिल्ह्यामध्ये पालकमंत्री या कार्यक्रमातून उपस्थित राहतील. १७ ऑगस्टला दोन ते अडीच कोटी महिलांना पहिला हप्ता देण्याच्या संदर्भामध्ये राज्य सरकारचा विचार असल्याचीही माहिती आहे. मात्र, राज्य सरकारच्या या निर्णयामुळे योजनेसाठी पात्र झालेल्या महिला भगिनींना मोठा दिलासा मिळाला आहे.

तालुका, जिल्हा आणि राज्य स्तरावर महिलांच्या आलेल्या अर्जांची आकडेवारी समोर येत आहेत. त्यामध्ये, महिला भगिनींचे मंजूर अर्ज, प्रलंबित अर्ज आणि नामंजूर अर्जही देण्यात येत आहेत. तर, प्रलिंबित अर्जांमधील काही त्रुटी दुरुस्त करुन ते मंजूर केले जाणार आहेत. तर, नामंजूर करण्यात आलेल्या अर्जांना पुन्हा नव्याने अर्ज भरण्यासाठी मुदत देण्यात आली आहे. आतापर्यंत १ कोटी ४० लाख अर्ज दाखल झाले असून त्यापैकी १ कोटी अर्जांची छाननी ही पूर्ण झालेली आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राज्य सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची घोषणा केली असून आता त्याची अंमलबजावणीही सुरू झाली आहे. या योजनेचा पहिला हप्ता ररक्षाबंधनच्या मुहूर्तावर दिला जाणार आहे. जुलै आणि ऑगस्ट महिन्यांचा एकत्रित हप्ता म्हणजेच ३ हजार रुपये लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात थेट १७ ऑगस्ट रोजी जमा होणार आहेत.

## ....आता राज्य सरकारची लाडकी मोलकरीण योजना

**(पान १ वरून)** मोलकरणींसाठी १० हजार रुपये किंमतीची भांडी-कुंडी, कुकर आदी साहित्याचा संच देण्यात येणार आहे.

दरम्यान, दिवंगत आर. आर. पाटील उपमुख्यमंत्री असतानाच १० लाख घरेलु कामगारांची संख्या असल्याची माहिती विधिमंडळात देण्यात आली होती. त्यावर तत्कालीन कामगारमंत्री हसन मुश्रीफ यांनीही शिक्कामोर्तब केलं होतं. आता १२ ते १३ लाख घरेलू कामगार असून, त्यांत ९९ टक्के महिला आहेत. मात्र त्यात नोंदणीकृत किती हा प्रश्नच आहे.

## कोट्यवधी रुपयांची उलाढाल असलेल्या कंपनीचा मुंबईतून काढता पाय,बंगरुळूत होणार शिफ्ट

**(पान १ वरून)** आदित पलिचा आणि कैवल्य वोहरा या दोन तरुणांनी झेप्टो या ऑनलाईन डिलिव्हरी सेवा देणाऱ्या कंपनीची स्थापना केली होती. काही वर्षात या कंपनीची उलाढाल ३.६ बिलियन डॉलरच्या घरात गेली. झेप्टोचे मुख्य ऑफिस जोगेश्वरी विक्रोळी लिंक रोडवरील वी वर्क इमारतीत होतं. या इमारतीत झेप्टोचं ९० हजार स्केअर फुटचं ऑफिस आहे. पण इथे या ऑफिसचं भाडं जास्त असल्याने

झेप्टो मुंबईतला गाशा गुंडाळणार आहे. झेप्टोचं एक कार्यायल मुंबईत असणार आहे, पण मुख्य कार्यालय बंगरुळुला शिफ्ट होणार आहे. यामुळे कंपनीचे भाड्यापोटी जाणारे महिन्याला ४० ते ५० लाख रुपयांची बचत होईस असे कंपनीने म्हटले आहे.

कंपनीचे को फाऊंडर कैवल्य वोहरा बंगरुळूत दाखल झाले आहेत आणि त्यांनी कामही सुरू केले आहे. बंगरुळूत सध्या झेप्टोचे ४० हजार स्केअर फुटाचे ऑफिस आहे. तसेच ७०० कर्मचारी कार्यरत आहेत. कंपनी आणखी ४०० जणांची भरती करणार आहे. कंपनीने मुंबईतल्या अनेक कर्मचाऱ्यांना बंगरुळूत शिफ्ट होण्याचे आवाहन केले आहे.

झेप्टोचे प्रतिस्पर्धी असलेल्या स्विगी आणि फ्लिपकार्टचे मुख्य कार्यालय बंगरुळूतच आहे. दक्षिण भारतात व्यवसाय वाढवण्यासाठी झेप्टोने हे पाऊल उचलेले आहे. आणि मुंबईच्या तुलनेत बंगरुळूत भाडं कमी असल्याने झेप्टोसाठी हा निर्णय फायदेशीर ठरणार आहे. मुंबईत ज्या ठिकाणी झेप्टोचं ऑफिस होतं तिथे एका स्केअर फिटमागे १५० ते १७० रुपये भाडं आकारलं जातं. तर बंगरुळूत एका स्केअर फुटासाठी ५० चे ४५ रुपये आकारले जाते. यामुळे झेप्टो कंपनीचे ४० ते ५० लाख वाचणार आहेत.

## ‘रक्षाबंधन’ निमित्त लाडकी बहीण योजना पात्र महिलांना साडी भेट

**(पान १ वरून)** महिलांच्या खात्यावर जमा करून बहिणींना राखीपौर्णिमेची ओवाळणी देण्याची घोषणा महायुती सरकारने केली आहे. अंबरनाथमध्ये या योजनेस पात्र महिलांना भारतीय जनता पार्टी, गुलाबराव करंजुले पाटील प्रतिष्ठान, रोझ फाउंडेशनच्या वतीने १८ ऑगस्ट रोजी रक्षाबंधन निमित्त साडी भेट देऊन सन्मान करण्यात येणार आहे. तरी शहरातील महिलांनी या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, या योजनेचा नोंदणी अर्ज भरण्यासाठी भारतीय जनता पार्टी जनसंपर्क कार्यालय, अंबरनाथ पूर्व छत्रपती शिवाजी महाराज चौक, बी केबिन रोड, येथे संपर्क साधावा. असे आवाहन भाजप कल्याण जिल्हा सचिव अभिजीत करंजुले पाटील यांनी केले आहे.


स्वच्छ भारत — एक कदम स्वच्छता की ओर
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ,**

जा.क्र. अंनप/बांधकाम विभाग/२०२४-२५/४५४ दि. ७/८/२०२४

**कोटेशन नोटीस**

अंबरनाथ नगरपरिषदेस खालील काम करावयाचे असुन, नोंदणीकृत ठेकेदार यांचेकडून त्याबाबत सिलबंद कोटेशन्स मागविण्यात येत आहेत. ज्या कोणास सदर काम करावयाचे असेल त्यांनी सदर कामांचे दर सर्व करांसह बंद पाकीटात खाली सही करणार यांचेकडे दि. १६/०८/२०२४ रोजी सायं. ३.०० वाजेपर्यंत आणून द्यावेत. तसेच आलेली कोटेशन त्याच दिवशी किंवा प्रशासनाच्या सोयीनुसार हजर कोटेशन धारकांसमक्ष उघडण्यात येतील. कोणतेही एक कोटेशन स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार निम्न स्वाक्षरीकार यांनी राखून ठेवला आहे. तसेच खालील पैकी कोणतेही एका कागदपत्र सादर न केल्यास किंवा सादर केलेल्या कोणत्याही कागदपत्रात खरेपणा न आढळल्यास कोटेशन फेटाळण्यात येतील याची नोंद घ्यावी.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रू. (GST वगळून) | इसारा रक्कम रू. |
|---|---|---|---|
| १ | अंबरनाथ नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र. ०६ खाकरवाडी शिवसह्याद्र आणि वृंदावन बिल्डींग परिसरात पी.सी.सी. करून चेकर्ड टाईल्स बसविणे. | र.रु.७,४३,८५१/- | र.रु. ७४३९/- |

१) तांत्रिक बोलीचा लिफाफा क्र. ०१
अ) पॅनकार्ड
क) कॉन्ट्रॅक्टर परवाना.
ड) जी. एस. टी. नोंदणी प्रमाणपत्र.
इ) इसारा रक्कमेचा डी. डी.
२) वित्तीय बोलीचा लिफाफा क्र. ०२
अ) मूळ प्रतितील दरपत्रक.

टिप :- सदर कोटेशन नगरपरिषदेच्या www.ambarnathcouncil.net या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
प्रत :- सुरक्षा विभाग नगरपरिषद नोटीस बोर्डावर प्रसिध्दीकरिता.

सही/-
(डॉ. प्रशांत रसाळ)
मुख्याधिकारी
अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ



**कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण**
पाणी पुरवठा विभाग
निविदा सूचना क्र. ०१/२०२४-२५

आयुक्त, कल्याण डोबिवली महानगरपालिका क्षेत्रातील ६ (सहा) कामाकरीता योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत (सी. पी. डब्ल्यू डी / सार्वजनिक बांधकाम महाराष्ट्र शासन /सीडको / बृहन्मुंबई महानगरपालिका/ रेल्वे/मजीप्रा) कंत्राटदाराकडून निविदा मागवित आहे.
कोरे निविदा फॉर्म व निविदेबाबत सर्व अटी व शर्तीची माहिती महाराष्ट्राचे www.mahatenders.gov,in या संकेतस्थळावर दिनांक ०९/०८/२०२४ ते १६/०८/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत उपलब्ध आहेत.
निविदा ई-टेंडरींग कार्यप्रणालीद्वारे दि. १६/०८/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत भरत येतील. प्राप्त निविदा दि. १९/०८/२०२४ रोजी सायंकाळी ४.०० वाजता शक्या झाल्यास उघडण्यात येईल.
सदर कामाची निविदा पूर्व बैठक दिनांक १२/०८/२०२४ रोजी दुपारी ३.०० वा. शहर अभियंता, क. डों.म.पा. कल्याण यांचे दालनात घेण्यात येईल.
कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार आयुक्त कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांनी राखुन ठेवला आहे व त्यांचा निर्णय कायदेशीररित्या सर्व निविदांसाठी बंधनकारक राहील.

कडोंमपा/जसंवि/मुका/१५१६
दिनांक ०७/०८/२०२४

सही/-
शहर अभियंता
कल्याण डोंबिवली महानगरपालिका
कल्याण



**ठाणे महानगरपालिका, ठाणे**
सार्वजनिक आरोग्य विभाग
पहिली मुदतवाढ निविदा सूचना

ठाणे महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकडील मध्यवर्ती औषधी भांडारातर्फे महानगरपालिकेच्या रुग्णालये, दवाखाने, आरोग्य केंद्र यांना दैनंदिन वापरासाठी लागणा-या लसी खरेदीसाठी आल्या होत्या. सदर निविदेस दि.१२.०८.२०२४ ते दि.१९.०८.२०२४. पहिली मुदतवाढ देण्यात येत आहे. निविदा सूचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ "http://www.thanecity.gov.in" दि.१२.०८.२०२४ ते दि.१९.०८.२०२४ रोजी १६:०० वाजेपर्यंत ऑनलाइन निविदा स्विकारण्यात येतील दि.२०.०८.२०२४ रोजी १२.०० वा. स्विकारलेल्या निविदा ऑनलाइन उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/आरोग्य/२५२/२०२४-२५
दि:०७.०८.२०२४

सही/-
उप-आयुक्त (आरोग्य)
ठाणे महानगरपालिका, ठाणे

**Pls visit our oficial web-site www.thanecity.gov.in**



**नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रम**
बेलापूर भवन, ८ वा मजला, सेक्टर-११, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई- ४००६१४

**स्थापत्य विभाग**
**ई-निविदा सुचना**
**निविदा सु. क्र.** नमुंमपा/परिवहन/का.अ.(स्था)/०४/२०२४-२५
**विषय : नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या अंतर्गत असलेल्या बस आगार व बस स्थानकातील खड्डे डांबरीकरण करून बुजविणे. (वार्षिक ठेका)**
**१) परिमंडळ-१ अंदाजपत्रकीय रक्कम रू. २०,०८,२६२/-(+१८ % GST)**
**२) परिमंडळ-२ अंदाजपत्रकीय रक्कम रू. १२,८५,३४१/-(+१८ % GST)**
सदर बाबतची सविस्तर माहिती संकेतस्थळ https://mahatenders.gov.in यावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार परिवहन व्यवस्थापक, नमुंमपा, परिवहन उपक्रम यांनी राखून ठेवलेला आहे.

**जा. क्र. नमुंमपा/परि/प्रशा/७९८/२०२४**
दि. ०७/०८/२०२४

**सही/-**
(योगेश कडुसकर)
**परिवहन व्यवस्थापक**
**नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रम**



Public Trusts Registration Office, Thane
Address: 1st Floor,Lilly Apt, Parsi Agari Lane
Tembi Naka Thane (w)- 400601

**Public Notice**

Service Request Number : THN12251/18/24
Inquiry/case No. : ACC/III/583/2024
Name of the Trust : आपुलकी चॅरिटेबल ट्रस्ट
**Address of the Trust : शॉप नं-११, कमर्शियल बिल्डींग नंबर-२, रिजन्सी अनन, कल्याण (पूर्व), ठाणे, ठाणे, ठाणे**
**Name of the Applicant : श्री. प्रशांत लवू देसाई**

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Thane.

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash In Hand | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only
(In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only
(In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 05/08/2024.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Thane

## भारतीय सैन्य दल

■ पदाचे नाव तपशील:
पद क्र. पदाचे नाव पद संख्या
१ हवालदार – २ नायब सुभेदार –
■ क्रीडा पात्रता: ॲथलेटिक्स, तिरंदाजी बास्केटबॉल बॉक्सिंग, डायव्हिंग, फुटबॉल, तलवारबाजी, जिम्नॅस्टिक्स, हॉकी, हँडबॉल, कबड्डी. ज्यांनी वर नमूद केलेल्या कोणत्याही खेळ आणि खेळांमध्ये खालीलप्रमाणे प्रतिनिधित्व केले आहे:- (E) व्यक्ती राष्ट्रीय स्पर्धांमध्ये राज्याचे प्रतिनिधित्व करून कनिष्ठ/वरिष्ठ स्तरावर पदक विजेता असावी किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर (इंडल इव्हेंट) देशाचे प्रतिनिधित्व केले असेल. (ab) व्यक्तीने कनिष्ठ/वरिष्ठ स्तरावर (सांघिक स्पर्धा) राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये राज्य किंवा देशाचे प्रतिनिधित्व केलेले असावे. (ac) वैयक्तिक खेळो इंडिया गेम्स आणि युथ गेम्समध्ये पदक विजेता असावा.
■ शैक्षणिक पात्रता: पद क्र.१: १०वी उत्तीर्ण
पद क्र.२: १०वी उत्तीर्ण
■ वयाची अट: जन्म ०१ ऑक्टोबर १९९९ ते ३० सप्टेंबर २००६ दरम्यान झालेला असावा.
■ अर्ज पाठविण्याचा पत्ता: Directorate of PT Sports General Staff Branch IHQ of MoD (Army) Room No 747 "A' Wing, Sena Bhawan PO New Delhi -110 011
■ अर्ज पोहचण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४
■ वेबसाईट https://www.indianarmy.nic.in/

## मध्य रेल्वे

■ जागा : २४२४
■ पदाचे नाव: अप्रेंटिस
मुंबई
भुसावळ
पुणे
नागपूर
सोलापूर
■ शैक्षणिक पात्रता: (i) ५०% गुणांसह १०वी उत्तीर्ण (ii) संबंधित ट्रेड मध्ये NCVT (Fitter/Welder / Carpenter/ Painter/Tailor/Electrician/ Mechanist / PASAA / Mechanical Diesel / Lab Assistant/Turner/ Electronics Mechanic/Sheet Metal Worker / Winder / MMTM/Tool Die Maker/Mechanical Motor Vehicle/IT Electronic System Maintenance)
■ वयाची अट: १५ जुलै २०२४ रोजी १५ ते २४ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: मध्य रेल्वे
■ Fee: General/OBC: 100/- SC/ST/PWD/EWS/महिला: फी नाही
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: १५ ऑगस्ट २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://cr.indianrailways.gov.in/

## इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेट्रोलॉजी

■ जागा : ३०
■ पदाचे नाव :
MRFP रिसर्च फेलो
■ शैक्षणिक पात्रता: (i) ५५% गुणांसह संबंधित विषयात पदव्युत्तर पदवी (M.Sc./ M.Tech) SC/ST/PwBD:50% JwU (ii) NET/GATE/LS (CSIR/UGC/IC-R).
■ वयाची अट:
१० ऑगस्ट २०२४ रोजी २८ वर्षांपर्यंत
SC/ST: ०५ वर्षे सूट,
OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: पुणे
■ फी : फी नाही.
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख:
१० ऑगस्ट २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://www.tropmet.res.in/

## होमगार्ड भरती २०२४

■ जागा : ९०००
पदाचे नाव :
१ होमगार्ड
■ जिल्हानिहाय रिक्त पदे:
अ.क्र. जिल्हा पद संख्या
१ सातारा ४९५
२ नांदेड ३२५
३ रत्नागिरी ४५८
४ जळगाव ३२५
५ चंद्रपूर ८२
६ यवतमाळ १२१
७ सिंधुदुर्ग १७७
८ धुळे १३८
९ हिंगोली ७५
१० अमरावती १४१
११ बीड २३४
१२ धाराशिव २३७
१३ वाशिम ५९
१४ भंडारा ३१
१५ नंदुरबार ७९
१६ गडचिरोली १४१
१७ रायगड ३१३
१८ लातूर १४३
१९ पुणे १८००
२० सांगली ६३२
२१ नाशिक १३०
२२ कोल्हापूर २८७
२३ वर्धा ७६
२४ छ. संभाजीनगर ४६६
२५ नागपूर ८९२
२६ जालना १९५
२७ अकोला १५१
२८ अहमदनगर ३५९
२९ बुलढाणा २४८
३० बृहन्मुंबई –
■ शैक्षणिक पात्रता: किमान १०वी उत्तीर्ण
■ शारीरिक पात्रता:
उंची छाती धावणे
पुरुष १६२ से.मी. ७६ सेमी व फुगवून ५ सेमी जास्त १६०० मीटर
महिला १५० से.मी. – ८०० मीटर
■ वयाची अट: २० ते ५० वर्षे.
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
■ फी : फी नाही.
■ महत्त्वाच्या तारखा:
अ. क्र. जिल्हा जपश्रळपश अर्ज करण्याची शेवटची तारीख
१ सातारा ३१ जुलै २०२४
२ नांदेड १४ ऑगस्ट २०२४
३ रत्नागिरी १४ ऑगस्ट २०२४
४ जळगाव १४ ऑगस्ट २०२४
५ चंद्रपूर १० ऑगस्ट २०२४
६ यवतमाळ १७ ऑगस्ट २०२४
७ सिंधुदुर्ग १४ ऑगस्ट २०२४
८ धुळे १४ ऑगस्ट २०२४
९ हिंगोली १४ ऑगस्ट २०२४
१० अमरावती ०५ ऑगस्ट २०२४
११ बीड १६ ऑगस्ट २०२४
१२ धाराशिव १४ ऑगस्ट २०२४
१३ वाशिम १४ ऑगस्ट २०२४
१४ भंडारा १६ ऑगस्ट २०२४
१५ नंदुरबार १४ ऑगस्ट २०२४
१६ गडचिरोली १४ ऑगस्ट २०२४
१७ रायगड १६ ऑगस्ट २०२४
१८ लातूर १६ ऑगस्ट २०२४
१९ पुणे ११ ऑगस्ट २०२४
२० सांगली १४ ऑगस्ट २०२४
२१ नाशिक १४ ऑगस्ट २०२४
२२ कोल्हापूर १४ ऑगस्ट २०२४
२३ वर्धा १५ ऑगस्ट २०२४
२४ छ. संभाजीनगर १४ ऑगस्ट २०२४
२५ नागपूर २४ ऑगस्ट २०२४
२६ जालना १७ ऑगस्ट २०२४
२७ अकोला १७ ऑगस्ट २०२४
२८ अहमदनगर १७ ऑगस्ट २०२४
२९ बुलढाणा १७ ऑगस्ट २०२४
३० बृहन्मुंबई १४ ऑगस्ट २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://maharashtracdhg.gov.in/mahahg/login1.php

## महाराष्ट्र राज्य नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग

■ जाहिरात क्र.: ०१/२०२४
■ जागा : २८९
■ पदाचे नाव :
१ रचना सहायक (गट ब)
२ उच्चश्रेणी लघुलेखक (गट ब)
३ निम्न श्रेणी लघुलेखक (गट ब)
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: स्थापत्य किंवा ग्रामीण आणि स्थापत्य/नागरी व ग्रामीण किंवा वास्तुशास्त्र किंवा बांधकाम तंत्रज्ञान डिप्लोमा
पद क्र.२: (i) १०वी उत्तीर्ण उत्तीर्ण (ii) लघुलेखन १२० श.प्र.मि. (iii) इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. किंवा मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि.
पद क्र.३: (i) १०वी उत्तीर्ण उत्तीर्ण (ii) लघुलेखन १०० श.प्र.मि. (iii) इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. किंवा मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि.
■ वयाची अट: २९ ऑगस्ट २०२४ रोजी १८ ते ३८ वर्षे मागासवर्गीय/आ.दु.घ.: ०५ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
■ फी : खुला प्रवर्ग: १०००/- मागासवर्गीय: ९००/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २९ ऑगस्ट २०२४
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत वेबसाईट
https://dtp.maharashtra.gov.in/


## भारतीय हवाई दल

■ पदाचे नाव तपशील:
१ अग्निवीरवायु इनटेक
■ शैक्षणिक पात्रता: ५०% गुणांसह १२वी उत्तीर्ण (Mathematics, Physics and English) किंवा इंजिनिअरिंग डिप्लोमा (Mechanical / Electrical / Electronics / -utomobile / Computer Science / Instrumentation Technology / Information Technology) किंवा गैर-व्यावसायिक विषयासह दोन वर्षांचा व्यावसायिक अभ्यासक्रम उदा. Physics and Mathematics. किंवा ५०% गुणांसह १२वी उत्तीर्ण + ५०% गुणांसह इंग्रजी.
■ शारीरिक पात्रता:
उंची/छाती पुरुष महिला
उंची १५२.५ सेमी १५२ से.मी.
छाती ७७ से.मी./किमान ०५ सेमी फुगवून.
■ वयाची अट: जन्म ०३ जुलै २००४ ते ०३ जानेवारी २००८ दरम्यान.
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: ५५०/- + GST
■ महत्त्वाच्या तारखा:
अर्ज करण्याची शेवटची तारीख: २८ जुलै २०२४
■ परीक्षा: १८ ऑक्टोबर २०२४ पासून
■ अधिकृत वेबसाईट https://indianairforce.nic.in/

## भारतीय रेल्वे

### भारतीय रेल्वे

■ जागा : ७९५१
■ पदाचे नाव :
१ केमिकल सुपरवाइजर/रिसर्च
२ मेटलर्जिकल सुपरवाइजर/रिसर्च
३ ज्युनियर इंजिनिअर
४ डेपो मटेरियल सुपरिटेंडंट
५ केमिकल मेटलर्जिकल असिस्टंट
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: केमिकल टेक्नोलॉजी पदवी.
पद क्र.२: मेटलर्जिकल इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.३: इंजिनिअरिंग डिप्लोमा (Mechanical / Electrical / Electronics/ Civil/ Mechanical / Production / Automobile / Instrumentation and Control / Manufacturing / Mechatronics / Industrial / Machining / Tools and Machining / Tools and Die Making / Automobile / Information Technology / Communication Engineering / Computer Science and Engineering / Computer Science / Computer Engineering)
पद क्र.४: कोणत्याही विषयातील इंजिनिअरिंग डिप्लोमा.
पद क्र.५: ४५% गुणांसह इ.डल (Physics/ Chemistry)
■ वयाची अट: ०१ जानेवारी २०२५ रोजी १८ ते ३६ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: 500/- SC/ST/ ExSM²/ट्रान्सजेंडर/EBC/महिला: २५०/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २९ ऑगस्ट २०२४ (११:५९ झच्)
■ अर्ज दुरुस्ती: ३० ऑगस्ट ते ०८ सप्टेंबर
■ वेबसाईट https://indianrailways.gov.in/




### भारतीय सैन्य एनसीसी स्पेशल एंट्री स्कीम

■ कोर्सचे नाव: NCC स्पेशल एंट्री स्कीम एप्रिल २०२५-५७ कोर्स
पदाचे नाव तपशील:
१ NCC स्पेशल एंट्री (पुरुष) ७०
२ NCC स्पेशल एंट्री (महिला) ०६
■ शैक्षणिक पात्रता:
NCC "C' Certificate Holders: (i) ५०% गुणांसह पदवीधर (ii) ०२ वर्षे NCC मध्ये सेवा (iii) NCC प्रमाणपत्र.
Ward of Battle Casualties of Army Personnel: ५०% गुणांसह पदवीधर.
वयाची अट: जन्म ०२ जानेवारी २००० ते ०१ जानेवारी २००६ दरम्यान.
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ फी : फी नाही.
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०९ ऑगस्ट २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://indianarmy.nic.in/




# 'डाल रोटी' चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित

युवा वर्गाने शेती करून तिला एक व्यापक स्वरुप द्यावे तसेच त्यातून प्रगती साध्य करावी, निर्धार पक्का असेल सध्याच्या कृषी समस्यांचे आव्हान त्यांना सहजपणे पेलता येईल, याबाबत मनोरंजनाच्या माध्यमातून मार्गदर्शन करत देशभक्तीचा संदेश देणाऱ्या ऋडाल रोटी' चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाला आहे. त्याला प्रेक्षकांकडून उत्तम प्रतिसाद मिळत आहे. आफ्ताब पिक्चर्सच्या बॅनरखाली सलीम अख्तर यांनी निर्मिती केली आहे. यापूर्वी त्यांनी राज सिप्पी यांच्यासमवेत कयामत, लोहा, जे. पी. दत्ता यांच्यासमवेत बटवारा, अशोक गायकवाड यांच्यासमवेत दूध का कर्ज, इज्जत, फूल और अंगार, राजा की आयेगी बारात, फारूख सिद्दीकी, राज कंवर यांच्यासमवेत अनेक चित्रपट दिले आहेत. पहिल्यांदाच ते महिला दिग्दर्शक जुली जास्मिन यांच्यासमवेत हा चित्रपट करत आहेत. शमा अख्तर या कार्यकारी निर्मात्या आहेत. यात दिशांत गुलिया, रुपाली थापा, कौस्तुभ दबराल, प्रियांका देहलान, रेणू मल्होत्रा, रितू गुलाटी, अजय शर्मा, राकेश गिरी, अरुण नागी, आदित्य भारद्वाज, साहिल सिद्दीकी, अनमोल चौधरी असे कलाकार आहेत. या चित्रपटाच्या माध्यमातून प्रेक्षकांना आपल्या देशाबद्दलचे प्रेम अधिक जागरूक होणार आहे. यात राष्ट्रगीताचीही उत्तम निर्मिती केली गेली आहे. प्रेक्षकांसाठी ट्रेलर प्रदर्शित करण्यात आला आहे. त्यातून या चित्रपटाच्या कथानकाची कल्पना येते.

# विनेश फोगाट ऑलिम्पिकमधून अपात्र घोषित, भारताचे पदक हुकले



पॅरिस : पॅरि ऑलिम्पिकमधून भारतासाठी अतिशय वाईट बातमी समोर आली आहे. कुस्तीपटू विनेश फोगाटला ऑलिम्पिकमधून अपात्र ठरवण्यात आलं आहे. यामागे मोठं कारणंही समोर आलंय. ५० किलो कुस्ती स्पर्धेत फक्त १०० ग्रॅम वजन जास्त असल्याने तिला अपात्र करण्यात आलंय. त्यामुळे तिला फायनलमध्ये भाग घेता येणार नाही. त्याहूनही धक्कादायक बाब म्हणजे, अपात्र ठरवल्याने विनेश फोगाटला सिल्व्हर मेडल देखील मिळणार नाही. या बातमीने कोट्यवधी भारतीय नाराज झाले आहेत. विनेश फोगाटने वर्ल्ड चॅम्पियन महिलेला हरवून फायनलमध्ये प्रवेश केला होता. अशी कामगिरी करणारी ती पहिलीच भारतीय महिला ठरली होती. विनेशच्या या कामगिरीने कोट्यवधी भारतीय आनंदीत झाले होते. अनेकांनी तिच्यावर शुभेच्छांचा वर्षावर देखील केला. आता विनेश फायनल सामना जिंकून भारतासाठी ऑलिम्पिकमध्ये गोल्ड नक्कीच मिळवणार अशी क्रीडाप्रेमींना आशा होती. मात्र, फायनल सामन्यापूर्वी विनेश फोगाटला अपात्र घोषित करण्यात आलंय.
विनेश फोगाटला अपात्र ठरवण्याचा वृत्ताला खुद्द भारतीय ऑलिम्पिक संघटनेनेच दुजोरा दिला आहे. फायनल सामना सुरू होण्याआधीच आज सकाळी विनेशचे वजन करण्यात आले. यावेळी तिचे वजन ५० किलोपेक्षा १०० ग्रॅम अधिक भरले. म्हणूनच तिला अपात्र घोषित करण्यात आल्याचं भारतीय ऑलिम्पिक असोसिएशनने म्हटले आहे. असोसिएशनने सांगितले की, विनेश फोगाटला महिला कुस्तीच्या ५० किलो गटातून अपात्र ठरवण्यात आल्याचे भारतीय संघाला दु:ख झाले आहे. मंगळवारी विनेशचे अचानक २ किलो वजन वाढले होते. संघाने तिचे वजन कमी करण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न केले. मात्र, तरीही आज सकाळी तिचे वजन १०० ग्रॅम अधिक भरले. दरम्यान, अंतिम फेरीसाठी पात्र ठरल्यानंतर विनेश फोगाटने मंगळवारी तिच्या आईशी व्हिडिओ कॉलद्वारे संवाद साधला. विनेशने आई आणि कुटुंबीयांशी बोलताना सुवर्णपदक जिंकण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, आता ती या स्पर्धेतून बाहेर पडली आहे. या बातमीने कोट्यवधी भारतीयांची मने दुखावली आहे.

### तू हार मानणाऱ्यांमधील नाही, संपूर्ण देश तुझ्या पाठीशी! : राहुल गांधी

भारताची स्टार कुस्तीपटू विनेश फोगाटला पॅरिस ऑलिम्पिमध्ये अपात्र ठरवण्यात आल्यामुळे भारताला मोठा धक्का बसला आहे. ५० किलो वजनी गटात ती फायनलमध्ये पोहोचली होती. सलग चारवेळा विश्वविजेती आणि टोकियो ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक विजेत्या जपानच्या युई सुसाकीला तीने मात दिली होती होती, त्यामुळे तिंच गोल्ड मेडल निश्चित मानलं जात होतं. मात्र आज निर्णय आला आणि संपूर्ण देशाला धक्का बसला. दरम्यान लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केलं असून विनेश फोगाटला अपात्र घोषीत करणे दुर्दैवी असल्याचं म्हटलं आहे.
विश्वविजेत्या पहलवानाला हरवून फायनलमध्ये धडक दिलेल्या आणि भारताची शान असलेल्या विनेश फोगाटला छोट्याशा कारणावरून अपात्र ठरवणं दुर्दैवी आहे. आम्हाला पूर्ण विश्वास आहे की, भारतीय ऑलिम्पिक संघ या निर्णयाला आव्हान देईल आणि विनेशला न्याय मिळवून देईल.

### विनेश फोगाटची प्रकृती बिघडली, रुग्णालयात दाखल

विनेश फोगाटचं १०० गॅम वजन वाढल्यामुळे पॅरिस ऑलिम्पिकमधून अपात्र ठरवण्यात आले. त्यामुळे भारताची पहिल्या सुवर्णपदकाची संधी हुकली. आज विनेश फोगाटचा आज गोल्डसाठी सामना होता, पण त्याआधीच तिला अपात्र ठरवण्यात आले. विनेश पॅरिस ऑलिम्पिकमधून अपात्र ठरल्यानंतर अनेक भारतीयांच्या पदरी निराशा आली आहे. ५० किलो वजन गटात पात्र ठरण्यासाठी विनेशनं रात्रभर प्रयत्न केले. मिडिया रिपोर्ट्सनुसार, तिने आपली नखे कापली, केसं कमी केली, रक्तही दिल्याचं समोर आले. त्याशिवाय विनेश फोगाट हिनं रात्रभर व्यायाम केला होता. पण तरिही ५० किलोपर्यंत वजन कमी करण्यात तिला अपयश आल्याचं समोर आले आहे. आता मिळालेल्या माहितीनुसार, विनेश फोगाटती ० प्रकृती बिघडली आहे. पाण्याच्या कमतरतेमुळे विनेश फोगाटची प्रकृती बिघडली. उपचारासाठी तिला रुग्णालयात दाखल करण्यात आलेय. तिच्यावर उपचार सुरु करण्यात आले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, विनेश फोगाटला आयव्ही फ्लूइड देण्याची शिफारस करण्यात आली आहे.

### आवश्यक कारवाई करणार : केंद्रीय क्रीडामंत्री

जगातील नंबर १ खेळाडूला पराभूत केल्यानंतर भारताचं एक पदक निश्चित झालं होतं. मात्र फायनलमध्ये पोहोचल्यानंतर ती १०० ग्रॅममुळे बाहेर पडली आहे. दरम्यान अपात्रतेच्या मुद्द्यावर बोलताना मनसुख मांडविया म्हणाले की,' आज तिचं वजन ५० किलो १०० ग्रॅम आढळल्याने तिला अपात्र ठरवण्यात आलं आहे. भारतीय ऑलिम्पिक असोशिएशनने आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीकडे तिव्र निषेध नोंदवला आहे. भारतीय ऑलिम्पिक असोशिएशनच्या अध्यक्षा पी.टी. उषा या सध्या पॅरिसमध्ये आहेत. पंतप्रधानांनी त्यांच्याशी चर्चा करुन आवश्यक कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. यासह सरकारने तिला वैयक्तिक कर्मचारीसह सर्व सुविधाही उपलब्ध करुन दिल्या होत्या. '

### फोगाटच्या सासऱ्यांचा केंद्र सरकारवर गंभीर आरोप

विनेश फोगाटचे सासऱ्यांनी थेट सरकारवर गंभीर आरोप केले आहेत. तिचे सासरे म्हणाले की, ' विनेशविरुद्ध कट रचला जातोय. केसांमुळेही १० ग्रॅम वजन वाढतं. यात सरकारसह बृतभूषण सिंग यांचाही हात असल्याचा आरोप तिच्या सासऱ्यांनी केला आहे. यापूर्वी विनेशने अनेकदा सांगितलं होतं की, माझ्याविरुद्ध कट रचला जातोय. असंही तिच्या सासऱ्यांनी सांगितलं.





पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील

# महिलांना मिळणार 'पिंक रिक्षा'

## प्रभाग समिती कार्यालयामध्ये 'पिंक रिक्षा' योजनेचे अर्ज उपलब्ध

पनवेल : पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील महिला व मुलींना रोजगार मिळावा, त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हावा, त्यांचे आर्थिक- सामाजिक पुनर्वसन व्हावे आणि महिला वर्गाचा प्रवास सुरक्षित व्हावा, यासाठी शासनाने 'पिंक ई-रिक्षा' योजना सुरू केली आहे. या योजनेचा गरजू महिलांनी लाभ घ्यावा असे आवाहन महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे. या योजनेचे अर्ज पाचही प्रभाग समित्यांमध्ये उपलब्ध करून देण्यात आले आहे.

### योजनेसाठी पात्रता

*१. लाभार्थींचे कुटुंब महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असणे आवश्यक आहे.*
*२. अर्जदाराचे वय १८ ते ३५ वर्षे अनिवार्य आहे.*
*३. लाभार्थ्यांचे बँक खाते असणे आवश्यक आहे.*
*४. लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम तीन लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे.*
*५. लाभार्थ्यांकडे वाहनचालक परवाना असणे आवश्यक आहे.*
*६. विधवा, कायद्याने घटस्फोटित, राज्यगृहामधील इच्छुक प्रवेशित, अनाथ प्रमाणपत्र प्राप्त युवती, दारिद्र्यरेषेखालील महिलांना प्राधान्य देण्यात येईल.*

### आवश्यक कागदपत्रे

- योजनेच्या लाभासाठी ऑनलाइन अर्ज
- लाभार्थ्याचे आधारकार्ड, पॅनकार्ड
- महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र
- कुटुंबप्रमुखांचा उत्पन्नाचा दाखला
- बँक खाते पासबुक
- पासपोर्ट आकाराचे छायाचित्र
- मतदार ओळखपत्र, रेशनकार्ड, चालक परवाना, हमीपत्र




इच्छुक महिलांना रिक्षा चालवून आपला चरितार्थ चालविण्यासाठी अर्थसाहाय्य व इतर सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्यातील गरजू महिलांना 'पिंक ई-रिक्षा ही योजना महाराष्ट्र शासनाने लागू केली आहे. यासाठी सर्व करांसह ई-रिक्षांच्या एकूण किंमतीवर राज्य सरकारकडून २० टक्के अनुदान देण्यात येणार आहे.रिक्षा खरेदीसाठी शासनाने निश्चित केलेल्या वाहन पुरवठा संस्थेला मान्यता असलेल्या बँकेकडून रिक्षा खरेदीसाठी ७० टक्के कर्ज उपलब्ध करून देण्यात येणार आहे. उर्वरित १० टक्के रक्कम संबंधित महिलेला गुंतवावी लागणार आहे.

# सिडकोच्या गृह सोडतीपूर्वीच समाजमाध्यमांवर फसव्या जाहिरातींचा गैरवापर

पनवेल : सिडको महामंडळ नवी मुंबईतील रेल्वे स्थानकांलगत महागृहनिर्माण योजनेतून जुईनगर, खांदेश्वर, खारघर, मानसरोवर व इतर ठिकाणी शेकडो घरांचे बांधकाम करत आहे. घरांचे बांधकाम पूर्ण झालेले नसतानाही स्वातंत्र्यदिनी या घरांची सोडत निघेल, असे लघुसंदेश समाजमाध्यमांवर पसरविण्यात येत आहेत. खासकरून विविध राजकीय पक्षांच्या नेते-कार्यकर्त्यांकडून याचा गैरवापर केला जात असून यात अनेकांची फसवणूक होण्याचा संभव आहे.

*सिडकोने घरांच्या सोडत प्रक्रियेसाठी इच्छुकांनी कोणत्याही भूलथापांना बळी न पडण्याचे आवाहन यापूर्वीच केले आहे. सिडकोने अद्याप कोणतीही जाहिरात दिलेली नाही. किंवा कोणतीही तारीख सोडत प्रक्रियेसाठी निश्चित केलेली नाही. समाजमाध्यमांवर प्रसारित होणाऱ्या जाहिरातीविरोधात तक्रार करण्यासाठी सिडकोच्या दक्षता कार्यालयात नागरिक तक्रार करू शकतील. योजनेच्या अधिक माहितीसाठी सिडकोच्या पणन विभागाचे बेलापूर रेल्वे स्थानक येथील निवारा केंद्राशी संपर्क साधू शकतील.*
*– प्रिया रातांबे, जनसंपर्क अधिकारी, सिडको मंडळ*

नागरिकांना आपल्याकडे खेचून घेण्यासाठी राजकीय पक्ष कार्यकर्ते तसेच संबंधित व्यावसायिक या फसव्या जाहिरातील गैरवापर करीत आहेत. नवी मुंबई सिडको सोडत २०२४ असा मथळा असलेली माहिती एखाद्या अधिकृत शासकीय अर्जाप्रमाणे असलेली जाहिरात समाजमाध्यमात पसरवली जात आहे. या योजनेमध्ये हक्काचे घर मिळाल्यास रेल्वे स्थानकालगत घराचे स्वप्न पूर्ण होणार आहे. याच स्वप्नांचा आधार घेऊन काही व्यावसायिकांनी समाजमाध्यमांवर संबंधित महागृहनिर्माण योजनेत घर मिळविण्यासाठी अर्ज प्रक्रियेत सहकार्यासाठी संपर्क करण्याचे आवाहन केले आहे. सिडकोच्या जनसंपर्क विभागाने सोडतीची तारीख निश्चित केली नसल्याने अशा भूलथापांना बळी पडू नका, असे आवाहन केले आहे.

■ सिडकोच्या जनसंपर्क विभागाकडे जेवढी माहिती नाही त्याहून अधिक माहिती संबंधित व्यावसायिकांनी समाजमाध्यमांवर प्रसिद्ध करून रेल्वे स्थानकांलगत घरे मिळविण्यासाठी इच्छुकांचे लक्ष वेधले आहे. या खोट्या जाहिरातीमध्ये संबंधित योजना सिडको मंडळ प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वाने घरांची सोडत काढणार असल्याचे म्हटले आहे. तसेच सोडत खुली झाल्यानंतर पहिल्या तासात पाच ते सहा हजार घरांची नोंदणी होणार असल्याने अर्जदारांनी अर्ज भरण्यापूर्वी सर्व कागदपत्रे तयार ठेवावीत असे जाहिरातीमध्ये म्हटले आहे.

■ सहा लाखांपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या व्यक्तींना प्रधानमंत्री आवास योजनेत ३५ लाख रुपयांचे वन बीएचके घर खरेदी करता येईल. यासाठी अर्जदाराला प्रधानमंत्री आवास योजनेत नोंदणी करणे गरजेचे आहे. तसेच या योजनेत अडीच लाख रुपयांची अनुदान आणि मुद्रांक शुल्कामध्ये अडीच लाखांची सवलत मिळेल असेही म्हटले आहे. इतर इच्छुकांना ४२ लाख वन बीएचके घरासाठी आणि टूबीएचके घरासाठी ६५ लाख रुपयांचा दर या जाहिरातीमध्ये दर्शविण्यात आला आहे.

■ जाहिरात करणाऱ्या व्यावसायिकाने सिडकोच्या संकेतस्थळावर अर्ज नोंदणी सुरू झाल्यावर आवडीचे घर निवडून अर्जदाराने अर्ज नोंदणी केल्यानंतर सिडकोला आरक्षित कोट्यासाठी ७५ हजार रुपये अनामत रक्कम आणि सामान्य कोट्यासाठी दीड लाख रुपयांची अनामत रक्कम तीन दिवसांत जमा करावी लागणार आहे.

डीएचएल एक्सप्रेस इंडियाकडून

# राखी एक्सप्रेसची ऑफर्स

ठाणे / नवी मुंबई : डीएचएल एक्सप्रेस ही आंतरराष्ट्रीय एक्सप्रेस सेवेतील एक जागतिक आघाडीची कंपनी आहे आणि किरकोळ (रिटेल) ग्राहकांना खास ऑफर्स व सवलती देऊन रक्षाबंधनाच्या आनंदात भर घालत आहे. या सवलती १९ ऑगस्ट २०२४ पर्यंत वैध असून ग्राहकांना जागतिक स्तरावर ०.५ किलो ते २० किलोपर्यंतच्या राख्या आणि भेटवस्तूंच्या शिपमेंट्स पाठविण्यासाठी सवलतींचा लाभ घेता येईल. डीएचएल च्या देशभरातील ७०० हून अधिक किरकोळ सेवा केंद्रांच्या (रिटेल सर्व्हिस पॉईंट्सच्या) विस्तृत नेटवर्कवर आणि त्याच्या अधिकृत वेबसाइटवर या ऑफर्स उपलब्ध आहेत. डीएचएल एक्सप्रेस इंडियाचे व्हाइस प्रेसिडेंट (कमर्शियल), संदीप जुनेजा, यांनी या ऑफरवर प्रतिक्रिया देताना सांगितले की, 'राखी एक्सप्रेस ही एक मनापासून पुरविली जाणारी सेवा आहे आणि ही आम्ही आमच्या ग्राहकांना दरवर्षी उपलब्ध करून देतो व राखी एक्स्प्रेसला अनन्यसाधारण महत्त्व आहे कारण ती रक्षाबंधनाच्या आनंदोत्सवात वेगळ्या ठिकाणी राहत असलेल्या कुटुंबांमधील दरी भरून काढते. डीएचएल एक्सप्रेस इंडियामध्ये आम्ही 'लोकांना जोडतो, आयुष्याचा दर्जा उंचावतो' या आमच्या उद्देशासाठी काम करत असतो आणि राखी एक्सप्रेस या बांधिलकीचे एक मूर्तिमंत उदाहरण आहे. हा जबरदस्त उपक्रम सुरू करताना, वेगळ्या ठिकाणी राहण्याच्या क्षणांना बंधुभावाच्या आठवणींमध्ये बदलून कुटुंबांचे आयुष्य खोलवर प्रभावित करण्याचा आमचा प्रयत्न असतो. आम्ही एकमेकांच्या भावना जोडताना व जगभरातील प्रत्येक दारात आनंद पसरवताना आमच्यात सामील होऊन राखीचा उत्साह साजरा करा.

# नेरुळ विभागात अनधिकृत व्यवसायांवर व बेवारस वाहन पार्किंगवर धडक कारवाई

नवी मुंबई : नवी मुंबई पालिकेच्या कार्यक्षेत्रातील नेरुळ विभागाअंतर्गत येणारे नेरूळ रेल्वे स्टेशन पश्चिम व पूर्व, सेक्टर-२ नेरूळ राजीव गांधी ब्रिजजवळ, सेक्टर - १ शिरवणे न्यु मॉर्डन बार जवळ, सेक्टर -१५ फकिरा मार्केट नेरूळ, सेक्टर-६ सारसोळे, नेरूळ, येथे पदपथावर अनधिकृतरित्या व्यवसाय करणाऱ्या तसेच बेवारसपणे वाहन पार्कींग करणाऱ्यांवर संयुक्तरित्या सर्व विभागमार्फत मोहीमेचे आयोजन करण्यात आलेले होते.



सदर मोहीमेअंर्तगत अनधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्यांवर दि.०६ ऑगस्ट २०२४ रोजी डॉ. राहुल गेठे, उपआयुक्त(अतिक्रमण), नमुंमपा यांच्या मार्गदर्शनाखाली व सर्व विभाग कार्यालय यांचे मार्फत पदपथावर अनधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्यांवर हटविण्याची व सामान जप्तीची कारवाई करण्यात आली आहे. जप्त केलेल्या सामानामध्ये चौदा हातगाडी, तीन शेगड्या, छोटे-मोठे डब्बे, स्टील काउंटर, प्लॉस्टीक स्टुल, पानाची टपरी, गॅस सिलेंडर, छत्री, व्यवसायासाठी वापरत असलेले तीन टेम्पो इत्यादींचा समावेश आहे. जप्त केलेले सामान दि. ०६ ऑगस्ट २०२४ रोजी कोपरखैरणे क्षेपणभूमी येथे जमा करण्यात आलेले आहे.

सदर कारवाई सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी डॉ. अमोल पालवे व अतिक्रमण विभागातील कर्मचारी, आठ मजूर, चार टोईंग, दोन पिकअप, अतिक्रमण विभागाकडील पोलीस पथक समवेत सुरक्षारक्षक, नेरुळ स्थानिक पोलीस यांच्या मार्फत करण्यात आली आहे.. यापुढे देखील अशाप्रकारे अतिक्रमण विरोधी कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

# 'एपीएमसी'तील कचरा समस्या मार्गी

## १२५ कोटींच्या मंजूर निधीतून घनकचरा व्यवस्थापन करण्याचा प्रशासनाचा निर्णय

नवी मुंबई : वाशी येथील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमधील पाचही बाजारांच्या आवारात मोठ्या प्रमाणात दररोज सुमारे ६० टन कचरा निर्माण होतो. त्यातही फळे, भाजीपाला बाजारात नाशवंत माल अधिक येत असल्याने कचरा उचलण्यास वेळ लागला तर प्रचंड दुर्गंधी पसरते आणि त्यामुळे आरोग्याचाही प्रश्न उभा राहतो. परंतु, आता १२५ कोटी रुपयांचा निधी मिळाल्यानंतर त्याचा वापर एपीएमसी प्रशासन घनकचरा व्यवस्थापनासाठी करणार असून 'एपीएमसी'तील कचरा समस्या मार्गी लागणार आहे.

दहा वर्षांपासून मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीचे ६५ कोटी रुपये देना बँक मलबार हिल शाखा येथे अडकले होते, परंतु आता त्याचा व्याजासहित परतावा मिळणार असून एपीएमसीला तब्बल १२५ कोटी रुपये मिळणार आहेत. या रकमेतून प्राधान्याने एपीएमसी बाजारातील रेंगाळलेला घनकचरा व्यवस्थापन आणि रस्ते दुरुस्ती करणार असल्याची माहिती एपीएमसी प्रशासनने दिली आहे.

■ एपीएमसीतील पाचही बाजारातून दररोज दिवसाला ६० टन कचरा निर्माण होत असतो. विशेषत: भाजीपाला आणि फळे बाजारात नाशवंत वस्तू अधिक असल्याने या ठिकाणी अधिक कचरा निर्माण होतो. गेल्या कित्येक वर्षांपासून एपीएमसी बाजार समितीचा कचरा विल्हेवाट आणि खतनिर्मिती प्रक्रिया प्रकल्प रेंगाळलेलाच आहे.

■ मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीने २०११ मध्ये अजित पवार यांच्या हस्ते या खतनिर्मिती प्रक्रिया प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात आले होते. त्यावेळी एपीएमसीला सिडकोकडून जागा दिली होती. त्यासाठी २५ कोटींची तरतूद केली होती. मात्र अद्याप त्या प्रकल्पाबाबत कोणताही निर्णय झाला नाही. एपीएमसीला घनकचरा व्यवस्थापनासाठी लागणारा निधी आणि जागा यासाठी हा प्रकल्प लांबणीवर पडला आहे. मात्र आता यासाठी अंदाजित ३० कोटींची तरतूद करता येईल आणि लवकरच हा प्रकल्प मार्गी लागेल असे मत प्रशासनाने व्यक्त केले.

एपीएमसीला आता निधी उपलब्ध होणार असून त्यामध्ये प्राधान्याने एपीएमसीमधील घनकचरा व्यवस्थापन आणि रस्ते दुरुस्ती करण्याचे नियोजन आहे. घनकचरा व्यवस्थापनासाठी जागेच्या शोधात आहोत.
**– डॉ. पी. एल. खंडागळे,** सचिव, एपीएमसी



# ठाणे स्थानकातील सॅटिस लवकरच प्रवाशांच्या सेवेत!

ठाणे : ठाणे स्थानकाच्या पूर्वेकडील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी महापालिका प्रशासनाने मोठा गाजावाजा करत हाती घेतलेला 'स्थानक परिसर वाहतूक सुधारणा प्रकल्प' (सॅटिस) वेगवेगळ्या अडथळ्यांनंतर मार्गी लागण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. 'सॅटिस'साठीच्या वेगवेगळ्या परवानग्यांचा टप्पा जवळपास पूर्ण झाला आहे. त्यामुळे येत्या वर्षभरात 'सॅटिस'ची शिल्लक कामे मार्गी लावण्यात येतील. मध्य रेल्वेवरील या महत्त्वाच्या स्थानकातून रोज साडेसात लाख प्रवासी ये-जा करतात. स्थानकाच्या पश्चिमेला सॅटिस पुलाची उभारणी करण्यात आली. त्याच धर्तीवर 'स्मार्ट सिटी' योजनेतून स्थानकाच्या पूर्वेला २६० कोटी रुपये खर्चाच्या सॅटिस पुलाची उभारणी करण्यात येत आहे.

### प्रकल्प असा

*■ या प्रकल्पात तुळजा भवानी मंदिर, पूर्व द्रुतगती महामार्गावरील सेवा रस्ता ते कोपरी कन्हैया नगर, एमजेपी कार्यालयापर्यंत एकूण २.२४ किमी लांबीचा उन्नत मार्ग.*
*■ यात १२ मीटर रुंद मार्गिका. स्थानकात वाहतूक व्यवस्थापनासाठी ९ हजार चौरस मीटर डेक उभारणी.*
*■ डेक उन्नत मार्गाला जोडण्यात येणार असून त्यात 'स्टेशन बिल्डिंग'चाही समावेश असेल.*
*■ डेकच्या तळघरात दुचाकी व चारचाकींसाठी वाहनतळ.*

### पूर्तता आणि नियोजन

*■ कोपरी पुलाशेजारी रेल्वेरुळाच्या दोन्ही बाजूच्या उड्डाणपुलाचे काम पूर्ण.*
*■ पुलाच्या जोडणीसाठी सहा ओव्हरहेड वायर खांबांच्या जागांच्या बदलांना रेल्वे विभागाची मंजुरी.*
*■ खांब स्थलांतरणाचे काम रेल्वे विभाग करणार असून त्यासाठी १ कोटी ९० लाख रुपये रेल्वे विभागाकडे जमा*
*■ या कामासाठी रेल्वे विभाग निविदा काढेल. त्यानंतर ठेकेदार निश्चित केला जाणार असून प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल.*
*■ रेल्वेने मेगाब्लॉक जाहीर केल्यानंतर पूलजोडणीचे काम पालिका करेल.*

### दिरंगाई का?

प्रकल्पाच्या आराखड्यांमध्ये करण्यात आलेले बदल आणि त्यांच्या मंजुरीसाठी होत असलेल्या दिरंगाईमुळे या प्रकल्पासाठीची मुदत याआधी हुकली होती. कोपरी पुलालगत या प्रकल्पाच्या जोडणीसाठी सहा ओव्हरहेड वायरचे खांब हलवावे लागत असल्याने रेल्वेच्या आवश्यक मंजुरींचा तिढाही गेले काही महिने कायम होता.

ठाणे पूर्व सॅटिस प्रकल्पाच्या कामाच्या सर्व परवानग्या मिळाल्या असून काम वेगाने पूर्ण करण्याचे पालिकेचे प्रयत्न सुरू आहेत.
**– संदीप माळवी,** अतिरिक्त आयुक्त, ठाणे महापालिका

या प्रकल्पाच्या कामाचा कार्यादेश पालिकेने २०१९ मध्ये ठेकेदार कंपनीला दिला. २०२२ मध्ये हा प्रकल्प पूर्ण होणार होता. परंतु ही मुदत उलटून गेल्यानंतर प्रकल्पाचे काम अद्याप पूर्ण होऊ शकलेले नाही. या प्रकल्पाचा आराखडा पालिका प्रशासनाने तयार केला होता. रेल्वेच्या जागेत होणाऱ्या कामांसाठी प्रशासनाची मंजुरी आवश्यक होती. यामुळे पालिकेने हा प्रस्ताव रेल्वे जमीन विकास प्राधिकरणाकडे पाठविला होता. मात्र, या विभागाने आराखड्यात सुचवलेल्या बदलानुसार पालिकेने सुधारित आराखडा तयार केला होता. त्यास प्राधिकरणाने मंजुरी दिली.

# ३५ सीसीटीव्ही कॅमेरे तपासून दोन दिवसांत सोनसाखळीचा शोध

नवी मुंबई : घणसोली येथील एका ज्येष्ठ नागरिक महिला दीड लाख रुपये किमतीची सोनसाखळी रिक्षात विसरली. पोलिसांनी ही रिक्षा शोधण्यासाठी तब्बल ३५ सीसीटीव्हींचे चित्रण तपासले आणि रिक्षाचालकाचा माग काढला. दोन दिवसांत महिलेला सोनसाखळी परत मिळाली.

चंद्रिका शशिधरन यांनी वाशी रेल्वे स्थानकाजवळ एका सोन्याच्या पिढीतून २० ग्रॅम वजनाची सोन्याची साखळी विकत घेतली. मात्र घरी येताना त्या ती रिक्षातच विसरल्या. त्यांनी रबाळे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

रबाळे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजीव धुमाळ यांनी साखळीचा तपास सुरू केला. यासाठी शशिधरन या रिक्षात बसल्यापासून उतरेपर्यंतच्या मार्गावरील ३५ हून अधिक सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे चित्रण तपासले, त्यात एक रिक्षा आढळून आली. क्रमांकावरून रिक्षा मालकाचा शोध घेतला मात्र रिक्षा मालक रिक्षा अन्य व्यक्तीला विकून उत्तर प्रदेश येथे गेला असल्याचे समजले. त्यामुळे नवीन मालकाचा शोध घेतला. मात्र त्यानेही रिक्षा कोपरखैरणेत राहणाऱ्या एका व्यक्तीला विकल्याचे समोर आले. त्यानंतर रिक्षाचालकाला कोपरखैरणे या ठिकाणी सापळा लावून ताब्यात घेतले. रिक्षाचालकाकडे अधिक चौकशी केली असता त्याने सोन्याची साखळी काढून दिली.

# विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा

पालघर : एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प डहाणू अंतर्गत आश्रमशाळांमधील ३०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना रात्रीच्या जेवणातून विषबाधा झाल्याचा प्रकार घडला आहे. त्रास झालेल्या विद्यार्थ्यांवर नजीकच्या सरकारी रूग्णालयांमध्ये उपचार सुरु असून सर्व विद्यार्थ्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती प्रशासनाने दिली. आदिवासी विकास विभागाकडून पालघर जिल्ह्यातील डहाणू आणि जव्हार प्रकल्प कार्यालय अंतर्गत आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी निवासी आश्रमशाळा चालविल्या जात आहेत. डहाणू प्रकल्प कार्यालय अंतर्गत ३७ आश्रमशाळा आणि एकलव्य मॉडेल शाळा असून यामधील ८५८५ निवासी व १०५९२ अनिवासी विद्यार्थी शिक्षण घेत असून एकूण १९१७७ विद्यार्थ्यांना बोईसर जवळील कांबळगाव येथील मध्यवर्ती स्वयंपाकगृहातून रोज दोन वेळचे भोजन आणि दोन वेळा अल्पोहार यांचा पुरवठा केला जातो.

संजय गांधी नॅशनल पार्कच्या आवारातील

# खदानीमध्ये अज्ञात तरुणाचा मृतदेह सापडला

ठाणे : ठाण्याच्या चितळसर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पटेल कॉरी जवळील, टिकूजिनी वाडी वॉटर पार्कच्या बाजूला असलेल्या खतांमध्ये एका २५ ते ३० वर्षीय तरुणाचा मृतदेह बुधवारी सकाळी १०-४५ वाजण्याच्या सुमारास आढळला. घटनास्थळी अग्निशमन जल आणि आपत्ती व्यवस्थापनाने मृतदेह बाहेर काढून चितळसर पोलिसांच्या स्वाधीन केला. याप्रकरणी चितळसर पोलीस ठाण्यात आकस्मिक निधनाची नोंद करण्यात आली आहे. टिकूजिनी वाडी वॉटर पार्कच्या बाजूला असलेल्या पटेल कुमारी येथील खदानीत २५ ते ३० वर्षीय तरुणाचा मृतदेह मृतावस्थेत सापडला. घटनास्थळी चितळसर मानपाडा पोलीस स्थानकाचे अधिकारी



व कर्मचारी, ठाणे आपत्ती प्रतिसाद दलाचे जवान, अग्निशमन दलाचे जवान आणि वनविभागाचे कर्मचारी उपस्थित होते. सदरचा मृतदेह बाहेर काढून चितळसर-मानपाडा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला आहे. मृतदेह तपासणी करता शासकीय जिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला. आता चितळसर पोलीस हे मृतदेहाची ओळख पटवून तरुण या खदानीत कशासाठी आला होता पाण्याचा अंदाज मिळाला नसल्याने तो बुडाला की घातपात झाला का? या प्रश्नाचा उलगडा करण्याचा प्रयत्न करत आहेत.

# पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी पालिकेने उपलब्ध केली नि:शुल्क शाडूची माती

## ०६ मूर्तीकारांनी घेतला योजनेचा लाभ, ०४ मूर्तीकारांना दिली मूर्ती घडविण्यासाठी नि:शुल्क जागा

### पर्यावरणपूरक गणेशोत्सवाच्या आयोजनासाठी ठाणे महापालिकेचे विविध उपक्रम

**ठाणे (मेधा भोईटे) : पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचे आयोजन व्हावे यासाठी ठाणे महापालिकेतर्फे मार्च महिन्यापासून विविध उपक्रम आयोजित करण्यात येत आहेत. याच अंतर्गत महापालिकेने यंदा ठाणे महापालिका क्षेत्रातील ०६ मूर्तीकारांना नि:शुल्क शाडूची माती, तसेच, ०४ मूर्तीकारांना मूर्ती घडविण्यासाठी नि:शुल्क जागा उपलब्ध करून दिली आहे.**



ठाणे महापालिका क्षेत्रातील गणेशोत्सव पर्यावरणपूरक व्हावा यासाठी महापालिकेच्या पर्यावरण विभागाने सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे, मूर्तीकार संघटना, स्वयंसेवी संस्थांची मदत घ्यावी, असे निर्देश महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत. या सगळ्यांच्या सहकार्याने हा उत्सव अधिकाधिक पर्यावरणपूरक करण्याकडे आपण मार्गक्रमण करू शकतो, अशी भूमिका आयुक्त राव यांनी मांडली आहे. त्यानुसार, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी दिलेल्या सूचनांनुसार ठाणे महापालिकेने पर्यावरणपूरक गणेशोत्सव नियमावली- २०२४ मार्च महिन्यात प्रकाशित करण्यात आली. तसेच, विविध घटकांशी संवाद साधण्यासाठी अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांच्या स्तरावर बैठकांचेही आयोजन करण्यात आले होते.

याच उपक्रमात, पालिकेच्या पर्यावरण विभागाने शाडूची नि:शुल्क माती तसेच मूर्ती घडविण्यासाठी नि:शुल्क जागा उपलब्ध करून दिली होती. शाडूच्या नि:शुल्क मातीसाठीच्या आवाहनाला सहा मूर्तीकारांनी मागणी नोंदवून प्रतिसाद दिला. तर, शाडूच्या मातीच्या मूर्ती घडविण्यासाठी चार मूर्तीकारांनी नि:शुल्क जागेची मागणी केली होती. त्यानुसार, महापालिकेने वर्तक नगर प्रभाग समिती क्षेत्रात ०३ आणि माजिवडा-मानपाडा प्रभाग समिती क्षेत्रात ०१ जागा दिली. इतर प्रभाग समिती क्षेत्रातून तशी मागणी झाली नाही, अशी माहिती मुख्य पर्यावरण अधिकारी मनिषा प्रधान यांनी दिली.

### प्रदर्शन आणि कार्यशाळा

दरम्यान, पर्यावरणपूरक गणेशोत्सवाच्या आयोजनाबाबत जनजागृती करण्यासाठी ठाणे महापालिकेने प्रथमच मूर्तीकार संघासोबत विष्णूनगरमधील महापालिकेच्या शाळा क्र.१९ येथे पर्यावरण स्नेही मूर्ती, मखर आदी साहित्यांचे प्रदर्शन भरविले. तेथे पुठ्ठा, कागद, कोकोपीठ, शाडू, लालमाती यांच्यापासून तयार करण्यात आलेल्या मूर्ती, कागदाचे मखर इत्यादी साहित्य ठेवण्यात आले होते. या प्रदर्शनासोबतच, नागरीकांसाठी शाडू मातीपासून गणपती तयार करण्याची कार्यशाळा पर्यावरण दक्षता मंडळ यांच्या समन्वयाने करण्यात आली. ठाणेकरांनी त्यास चांगला प्रतिसाद दिला. या प्रदर्शन साहित्याविषयीची अधिक माहिती आणि संपर्क ठाणे महापालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे मनीषा प्रधान यांनी सांगितले.



त्याच बरोबर, पर्यावरणपूरक उत्सवांच्या आयोजनात लहान मुलांचा सहभाग वाढविण्यासाठी शाडू मातीपासून मूर्ती तयार करण्याच्या कार्यशाळांचे शाळांमध्येही आयोजन केले. पहिल्या टप्प्यात परब वाडी, कळवा, किसन नगर, बाळकूम, दिवा, वर्तक नगर, शीळ, मानपाडा, येऊर आणि टेंभीपाडा येथील महापालिका शाळांमधील विद्यार्थ्यांनी या कार्यशाळांमध्ये सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी स्वत:च्या हातानी मूर्ती घडवलीच. शिवाय, पर्यावरण पूरक उत्सव साजरा करण्याची प्रतिज्ञाही केली.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१